Exh. 17/D



रे.क.नं. ४३/२०२६

मे.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर,पेठवडगांव

यांचे कोर्टात.......

श्री.आप्पासो दत्तात्रय खोत - वादी

विरुध्द

श्री.आनंदा विठोबा यंगारे - प्रतिवादी

Order
Seen

Sd/-
Jt. CJJD, Pethvadgaon

यातील प्रतिवादी नं. १ व २ यांचे तर्फे साक्षीदाराचे तुर्तातुर्त मनाई अर्जाचे चौकशी कामी ॲफिडेव्हीट खालील प्रमाणे.

## ॲफिडेव्हीट

मी यातील प्रतिवादी नं. १ व २ तर्फे साक्षीदार पांडूरंग लक्ष्मण घोदे व. व. ६३, धंदा-शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर .सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,

यातील वादी,प्रतिवादी व दावा मिळकत माझे माहितीची आहे. कुंभोज,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर येथील ग.नं. १६१० हा प्र.वादी नं. १ व २ यांचे मालकी, कब्जा,वहिवाटीचा आहे.सदर ग.नं.ची यातील प्र.वादी नं. १ व २ यांने ता. ८/१/२०२५ इ रोजी मोजणी करुन घेतली व ता. २८/१/२०२५ इ रोजी त्या ग. नंबरच्या हद्दी कायम करुन मोजणी कार्यालयाने दिल्या त्या वेळी मी तेथे हजर होतो. मोजणीच्या हद्दी कायम केल्या त्यावेळी वादी नं. १व २ ही त्या ठिकाणी हजर होते. वादी नं. १व २ यांनी ग.नंबर १६१० मध्ये अंजादे १२ गुंठे क्षेत्रात अतिक्रमण केले होते.ते ता. २८/१/२०२५ इ रोजी काढून अतिक्रमण क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा वादी नं.

Yu 10/3/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon

१ व २ यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांना दिलेला आहे. व अतिक्रमीत क्षेत्रातील ऊसाचे पिक पंचासमक्ष ठरलेप्रमाणे वादी नं. १ व २ यांना प्र.वादी नं. व १व२ यांनी दिले आहे. व सदरचे अतिक्रमीत क्षेत्र सद्या प्र.वादी नं. १व २ यांचे शांततामय कब्जा, वहिवाटीत आहे. म्हणून केले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट आज मु।। पेठ वडगांव,ता.१०/३/२०२६

I Know Deponant

[signature]

Adv. Pruthviraj R. Patil

[signature]

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं. १ व २ तर्फे साक्षीदार पांडूरंग लक्ष्मण घोडे व.व.६३, धंदा - शेती, रा.कुंभोज,ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर . अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती प्रमाणे व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मु।। पेठ वडगांव, ता.१०/३/२०२६

[signature]

Solemnly Affirmed before me by
Shri. Pandurang Laxman Ghode
Age. 63 of Kumbhoj Tal who is Hatkanangale
identified by S. P. R. Patil Adv.
.............whom I know personally
Dated :- 10/3/26

Assistant Superintendent